## निशाणी क्र. १३७ खाली आदेश

(दिनांक १७ माहे नोव्हेंबर २०२५ रोजी पारीत)

०१. वादीने सदरच्या अर्जाद्वारे प्रतिवादी क्र. ८ च्या मृत्यूमुळे त्याचे वारस अभिलेखावर बदलण्यासाठी झालेला विलंब माफ करावा, अशी मागणी केली आहे.

०२. वादीनुसार, प्रतिवादी क्र. ८ दि. ०१.१०.२०२३ रोजी मयत झालेले आहे. प्रतिवादी क्र. ८ हे मयत झाले असल्याने त्यांचे वारस अभिलेखावर वेळेत न घेतल्याने अर्जदार यांना १ वर्षे ७ महिने ९ दिवसाचा विलंब झालेला आहे. त्यांनी जाणून—बुजून विलंब केलेला नाही. तेव्हा त्यास मयताचे वारस अभिलेखावर बदलण्यासाठी झालेला विलंब माफ करावा, अशी त्यांनी विनंती केलेली आहे.

०३. प्रतिवादी यांनी म्हणणे सादर केले आहे. त्यांच्यानुसार, वादीने प्रतिवादी क्र. ८ चे वारस चुकीचे दाखविलेले आहे. वास्तविक प्रतिवादी क्र. ८ मयत अंगद शेळके यांची आई निलावती शेळके ही हयात आहे. वादींनी जाणुन—बुजून मयत प्रतिवादी क्र. ८ यास आई कायदेशीर वारस असताना समाविष्ट केलेले नाही. या सबबीखाली अर्ज नामंजूर करावा, अशी त्यांनी मागणी केलेली आहे.

०४. वादींच्या वतीने वकील श्री. पी. डी. क्षिरसागर यांना तर प्रतिवादींच्या वतीने वकील श्री. एस. एस. सारुक यांना ऐकले.

०५. दिवाणी प्रक्रिया संहितेच्या आदेश २२ नियम १ अन्वये वादी किंवा प्रतिवादी याचा मृत्यूमुळे जर का त्याच्या किंवा त्याच्याविरुद्ध दावा पुढे चालविण्यायोग्य त्यास वारस असतील तर तो बंद होत नाही तर नियम ३ अन्वये वादींच्या अर्जावरुन मयत प्रतिवादीचे वारसांना, जर का ते आवश्यक असतील तर आणि त्याबाबत समाधान केले जात असेल तर अभिलेखावर मयताऐवजी

बदलले जावू शकतात.

०६. उपरोक्त पार्श्वभूमीवर वादी यांच्यानुसार मयताचे वारस अभिलेखावर घेणे आवश्यक आहे. कारण दावा हा मालकी हक्काच्या जाहीरनाम्यासाठी आणि निरंतर मनाई हुकुमासाठीचा आहे. अशा परिस्थितीमध्ये निश्चितच मयताचे वारस हे दाव्यास आवश्यक पक्षकार आहेत. तेव्हा त्यांना मयताऐवजी बदलणे आवश्यक आहे. वेळेत मयताच्या वारसांना अभिलेखावर घेण्यात वादींनी दिरंगाई केल्यामुळे दावा बंद होण्याच्या आदेश झाला आहे, असे मानले जाते आणि त्यामुळे वादीला विलंब झालेला आहे. परंतु तो दावा पुढे गुणवत्तेवर चालण्यासाठी माफ करणे आवश्यक आहे जेणेकरुन मयताचे वारस अभिलेखावर बदलले जातील. असे असले तरी अर्जदारांनी मयत वादींचे वारस म्हणून न्यायालयासमक्ष येण्यास केलेला विलंब लक्ष्यात घेता प्रतिवादींना भरपाई मिळणे आवश्यक आहे कारण त्यांना अर्जदारांना विलंबामुळे अधिक कालावधीसाठी वाट पाहावी लागणार आहे. तेव्हा अर्ज मंजूर करताना खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे:

## **आदेश**

१. अर्ज विनंतीप्रमाणे रुपये ५००/— परीव्यय लादून मंजूर करण्यात येत आहे;

२. अर्जदारांनी पुढील तारखेपर्यंत परीव्यय रक्कम प्रतिवादी क्र. ६ ते ९ यांना हस्ते दिल्यावरुन किंवा देण्यासाठी जमा केल्यावरुन त्यांना उपरोक्त कारणासाठी झालेला विलंब माफ करण्यात येईल.

BHAGWAN DHONDIRAM PANDIT
Digitally signed by BHAGWAN DHONDIRAM PANDIT
Date: 2025.11.17 16:56:52 +0530

दिनांक: १७.११.२०२५

**(भगवान धों. पंडित)**
दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर,
भूम, जि. उस्मानाबाद.

## CERTIFICATE

I affirm that the contents of this P D F file order/ judgment are same word to word as per the original order/judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | : | R.H.Botre (Grade-II) |
| Name of Court | : | Civil Court Senior Division<br>Bhoom Tq. Bhoom<br>Dist.Osmanabad. |
| Order/ Judgment date | : | 17.11.2025 |
| Order/ Judgment signed by the Presiding Officer on | : | 17.11.2025 |
| Order/ Judgment uploaded on | : | 17.11.2025 |